# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

# ८४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(केवळ सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येते, की बँकेची ८४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता 'यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा' यांचे सभागृहात बँकेचे चेअरमन मा. शिर्के राजेंद्र संपतराव यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती आहे.

सभेपुढील विषय

१) दि.१७/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.

२) सन २०२३-२४ आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.

३) सन २०२३-२४ आर्थिक वर्षाचा मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षण अहवाल स्वीकारणे.

४) सन् २०२२-२३ आर्थिक वर्षाचा मा.वैधानिक लेखापरीक्षक यांचा दोष दुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.

५) कायदा व नियम यास अनुसरुन सन् २०२३ - २४ आर्थिक वर्षाच्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

६) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.

७) सन् २०२३-२४ आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन२०२४-२५ सालाकरिता अंदाजपत्रक मंजूर करणे.

८) सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षक गोगटे अँड कंपनी, पुणे यांच्या नेमणुकीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडील निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवून मंजुरी देणे.

९) सन २०२५-२६ आर्थिक वर्षाकरिता वैधानिक व अंतर्गत / समवर्ती लेखापरीक्षक यांची निवड करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेचे अधिकार मा. संचालक मंडळास देणेबाबत निर्णय घेणे.

१०) सन २०२३-२४ मध्ये संचालक व त्यांच्या नातेवाइकांना दिलेल्या कर्जाची वाचून नोंद घेणे.

११) सन २०२३-२४ मधील सभासद कल्याण ठेव योजनेच्या हिशोब पत्रकाची वाचून नोंद घेणे.

१२) बँक सेवकांच्या सुधारित स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.

१३) ८४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित (Condone) करणे.

१४) सभासदांकडून आलेल्या लेखी प्रश्नांचा खुलासा करणे.

१५) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : सातारा  
दिनांक : ०१/०९/२०२४

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार  
**भास्कर बाबूराव कणसे**  
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**सूचना :** बँकेच्या कामकाजासंबंधी अगर अहवालासंबंधी सभासदांना काही प्रश्न विचारायचे असतील., तर ते लिखित स्वरुपात दि.१२/०९/२०२४ पूर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयात पोहोचतील, अशा बेताने पाठवावेत. वार्षिक अहवालाची प्रत बँकेचे संकेत स्थळ www.rayatsevakbank.co.in वर उपलब्ध आहे. गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी पूर्वघोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने सदरची सभा घेतली जाईल. कृपया सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी सभासदांच्या भोजनाची सोय करणेत आली आहे.